दै. सत्यप्रभा दि. 12.10.25

## ट्रकसह ६ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

# वेअर हाऊस फोडून हळदीचे ३३ पोते लंपास ; ३ जण अटकेत

प्रतिनिधी । नांदेड

सिडको भागातील एमआयडीसी परिसरातील महाजन फुड प्रोडक्ट्स वेअर हाऊस फोडून हळदीचे ३३ पोते लंपास करणाऱ्या तीन चोरट्यांना गजाआड करून त्यांच्याकडून अशोक लीलँड ट्रकसह ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई ग्रामीण पोलिसांनी केली आहे.एमआयडीसी परिसरात असलेल्या महाजन फुड प्रोडक्ट्स वेअर हाऊसमध्ये दि.२९ सप्टेंबर रोजीच्या रात्री उशिरा चोरी करून चोरट्यांनी हळदीचे ३३ कट्टे लंपास केले होते. याप्रकरणी बाळासाहेब माने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि.८ ऑक्टोबर रोजी ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव आणि इतवाराचे उप विभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमाकांत चिंचोळकर यांनी या प्रकरणाचा तपास करण्यासाठी गुन्हे शोध विभागाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड, पाहेकॉ वसंत केंद्रे, पोकॉ विष्णु कल्याणकर, पोकॉ संतोष पठार, पोकॉ मारोती पचलिंग,पोकॉ गगलवाड यांच्या पथकाला निर्देश दिले.

आरोपींकडून अशोक लिलैंड कंपनीचा ट्रक क्र. एम एच २६ , सीएच ०१९३ आणि दीड लाख रुपये किमतीचा चोरी केलेला हळदीचा माल असा एकूण ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



### आरोपींकडून गुन्ह्याची कबुली

पोलिसांचे हे पथक शुक्रवारी ( दि.१० ) आरोपींच्या शोधासाठी मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार पोलिसांनी तुप्पा पाटी ते गोपाळचावडी मार्गावर सापळा रचून चोरीचा माल विकण्याच्या तयारीत असलेल्या तिघांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी केली असता बालाजी किशन गळापडे रा.बाभूळगाव ता.जि.नांदेड विनोद मधुकर कांबळे, व्यवसाय चालक रा.दिक्षा नगर बळीरामपुर आणि गजानन कचरू पवार, व्य. चालक रा. मरडगा ता. हदगाव ह.मु.गुरुवार बाजार सिडको अशी असून त्यांनी महाजन वेअर हाऊस फोडुन चोरी केल्याचे कबूल केले.